**माझी वसुंधरा अभियान १.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रकमेतून हाती घ्यावायच्या कामांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) प्रशासकीय मान्यता देण्याबाबत. ठाणे महानगरपालिका.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: मावअ २०२६/प्र.क्र.२८९(२१)/तां. क.१**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक: १६ ऑक्टोबर, २०२६

**वाचा:**

(१) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्र. अभियान- २०२१/प्र.क्र.५७/तां.क.१ दिनांक दिनांक ०८ जुलै, २०२१
(२) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्र. अभियान- २०२१/प्र.क्र.५७/ तां.क.१, दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२
(३) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्र. अभियान- २०२२/प्र.क्र.५७/ तां.क.१, दिनांक ०५ मे, २०२२
(४)प्रशासकीय मान्यता देण्यासाठी गठीत समितीच्या दिनांक ०१ सप्टेंबर, २०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त
(५) आयुक्त, ठाणे महानगरपालिका त्यांचे पत्र जा.क्र.ठामपा/प्रनिक/२९९/२६-२७ दिनांक २३ जून, २०२६

**प्रस्तावना :**

माझी वसुंधरा अभियान १.० मधील ०४ गटातील विजेत्या स्थानिक स्वराज्य संस्थांना रोख रकमांची पारितोषिके व सदर बक्षीस रकमेच्या विनियोगाची कार्यपध्दती संदर्भीय क्रमांक (१) येथील दिनांक ०८ जुलै, २०२१ च्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आली आहे. त्यानुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांनी पारितोषिकाच्या रकमेमधून हाती घ्यावयाच्या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून, त्यास संदर्भीय क्रमांक (२) येथील दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२२ च्या शासन निर्णयान्वये मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीकडून प्रशासकीय मान्यता घ्यावयाची आहे.

२. माझी वसुंधरा अभियान १.० अंतर्गत ठाणे महानगरपालिका प्राप्त होणाऱ्या रु. १०.०० कोटी बक्षीस रकमेतून हाती घ्यावायच्या कामाचा रू. १०.४८ कोटी किमतीच्या रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी शहर अभियंता, ठाणे महानगरपालिका यांची तांत्रिक मान्यता घेऊन सादर केला होता. सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास संदर्भिय क्र. (३) दिनांक ०५ मे, २०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

३. प्रशासकीय मान्यतेनंतर सदर काम सुरू करताना ठाणे महानगरपालिकेच्या असे लक्षात आले की, मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालामधील काही कामे करण्यासाठी सद्यस्थितीतील जागेची अनुपलब्धता तसेच तांत्रिक व स्थानिक अडचणीमुळे कामांमध्ये बदल करणे आवश्यक आहे. तसा सुधारित प्रस्ताव आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी दिनांक २३ जून, २०२६ पत्रान्वये सादर केला.

४. त्यानुसार, बक्षीस मिळालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त झालेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्यासाठी मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०१ सप्टेंबर, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांनी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालावर चर्चा होवून समितीने शिफारशी केल्या आहेत. समितीने केलेल्या शिफारशीनुसार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून माझी वसुंधरा अभियान १.० अंतर्गत ठाणे महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या बक्षीस रकमेतून हाती घ्यावायच्या सुधारित कामांचा रू. ४,९८,३३,३५२.०० (रुपये चार कोटी अठ्ठयाण्णव लक्ष तेहत्तीस हजार तीनशे बावन्न फक्त) किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी शहर अभियंता, ठाणे महानगरपालिका यांची तांत्रिक मान्यता घेवून सादर केला आहे. ठाणे महानगरपालिकेने सादर केलेला सदर प्रस्ताव मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीच्या दिनांक ०१ सप्टेंबर २०२६, रोजी झालेल्या बैठकीत विचारात घेण्यात आला. सदर समितीने केलेल्या शिफारशीनुसार, ठाणे महानगरपालिकेने सादर केलेल्या सुधारित प्रस्तावनुसार दिनांक ०५ मे, २०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली सोबतच्या रु. ४,९८,३३,३५२.०० (रुपये चार कोटी अठ्ठयाण्णव लक्ष तेहत्तीस हजार तीनशे बावन्न फक्त) रकमेच्या सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालातील कामांना खालील अटी व शर्तीच्या अधिन शासन प्रशासकीय मान्यता देत आहे. **प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत असलेली कामे सोबतच्या जोडपत्र-२ मध्ये दर्शविण्यात आली आहेत.**

२. ठाणे महानगरपालिकेने, दिनांक ५ मे, २०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या रू. ८,३७,७२,०९०.०० किंमतीच्या कामांपैकी **जोडपत्र-१** मध्ये दर्शविण्यात आलेली रु. ४,०९,७७,०२७.०० किंमतीची कामे पूर्ण केली. तसेच आता प्रशासकीय मंजूरीसाठी सादर केलेल्या रु. ४,९८,३३,३५२.०० किंमतीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याची शिफारस समितीने केली. अश्याप्रकारे एकूण रु. ९,०८,१०,३७९.०० किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तरी, **ठाणे महानगरपालिकेने प्रशासकीय मान्यतेसाठी सादर न केलेल्या रु. ९१,८९,६२१.०० रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून महानगरपालिकेचे शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेऊन तो प्रशासकीय मान्यतेसाठी पुनः शासनास सादर करावा.**

**३. अटी व शर्ती**

१) सदर सविस्तर प्रकल्प अहवालातील कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा **ठाणे महानगरपालिका** राहील.

२) सदर सविस्तर प्रकल्प अहवालात नमूद केलेल्या कामांच्या अंमलबजावणीचा आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत माझी वसुंधरा अभियान संचालनालयास पाठविण्यात यावा.

३) सदर सविस्तर प्रकल्प अहवालातील कामांची अंमलबजावणी प्रशासकीय मान्यता मिळाल्यापासून पुढील ६ महिन्यात पूर्ण करावी.

४) बक्षीस रकमेपेक्षा अधिकचा खर्च झाल्यास तो स्वनिधी मधून करण्यात यावा.

५) सदर सविस्तर प्रकल्प अहवालातील मूळ प्रकल्प किंमतीमध्ये कोणत्याही कारणास्तव वाढ झाल्यास, त्यासाठी कोणताही वाढीव निधी / अनुदान उपलब्ध करून दिले जाणार नाही.

४. माझी वसुंधरा अभियान १.० अंतर्गत ठाणे महानगरपालिकेला अमृत गटात राज्यस्तरावर पहिल्या क्रमांकासाठी रु. १०.०० कोटी रकमेचे बक्षिस प्राप्त झाले आहे. यापैकी ५०% म्हणजे रू. ५.०० कोटी एवढी रक्कम त्यांना वितरीत करण्यात आली आहे.

५.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६१०१६१३३३३१८३०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करून काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

SHAHEEN SWALI SHAIKH

Digitally signed by SHAHEEN SWALI SHAIKH
Date: 2026.10.16 14:46:08 +05'30'

**(शाहीन शेख)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई, ४०००३२
२) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई, ४०००३२
३) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा, युवक कल्याण अल्पसंख्याक विकास आणि औकाफ), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई, ४०००३२
४) मा. मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई, ४०००३२
५) मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई
६) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई
७) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई
८) विभागीय आयुक्त, कोकण विभाग
९) जिल्हाधिकारी, ठाणे
१०) आयुक्त, ठाणे महानगरपालिका
११) निवडनस्ती तां.क.१

***जोडपत्र- १***

शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक: मावअ २०२६/प्र.क्र.२८९(२१)/तां.क.१
दिनांक: १६ ऑक्टोबर, २०२६ चे सहपत्र
(शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्र. अभियान- २०२२/प्र.क्र.५७/ तां.क.१, दिनांक ०५ मे, २०२२ अन्वये मंजूर करण्यात आलेली व पूर्ण केलेली कामे )

| **अ.क्र.** | **कामांचे नाव** | **अंदाजपत्रकिय रक्कम (रु.)** |
|---|---|---|
| १ | To install RWH at & different locations | ९९,९९,८१९.०० |
| २ | Cleaning of ९९ wells | ९९,९९,८८५.०० |
| ३ | Promotion of renewable Sources of energy | १३,९७,५१४.०० |
| ४ | Installation of Solar/ LED street lights | १,१९,१६,४४७.०० |
| ५ | Creation of Charging points for EVs | २६,६३,३६२.०० |
| ६ | Prize distribution under Majhi Vasundhara Abhiyan | ५०,००,०००.०० |
| | **एकूण** | **४,०९,७७,०२७.००** |

***जोडपत्र- २***

शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक: मावअ २०२६/प्र.क्र.२८९(२१)/तां.क.१
दिनांक: १६ ऑक्टोबर, २०२६ चे सहपत्र

| **अ.क्र.** | **कामांचे नाव** | **अंदाजपत्रकिय रक्कम (रु.)** |
|---|---|---|
| १ | माझी वसुंधरा अभियान अंतर्गत माजिवडा मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत मेट्रो पूलाखालील रस्तादुभाजकात बांबू लागवड करणे | ४,९८,३३,३५२.०० |
| | **एकूण** | **४,९८,३३,३५२.००** |